क्र.पुरवठा/हिशोब/जि.पु.ज.-7/हमाल टेका/
2018 ते 2021/9/65/5739/2018
जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव
दिनांक:-11/12/2018

**महाराष्ट्र शासन**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव**
**हमाल कंत्राट निविदा सुचना**

**विषय** :- सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट सन 2018 ते 2021 या कालावधीसाठी निश्चित करण्यासाठी ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** :-1.शासन निर्णय क्रमांक कंत्राट-1217/प्र.क्र.98/नापु16अ दि.08मे2018.
2.शासन निर्णय समक्रमांक दि.08मे 2018 शासनाकडील शुध्दीपत्रक दि.01ऑक्टोबर2018 व दि.22 ऑक्टोबर 2018.

जिल्हाधिकारी, जळगांव जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, जळगांव यांच्याकडुन जळगांव जिल्ह्यासाठी सन 2018-2021 या कालावधीसाठी शासकीय धान्य गोदामातील शासकीय गोदामांमध्ये अन्नधान्य, साखर, तुरदाळ, भरडधान्य यासारखे धान्य व इतर वस्तु हाताळणुकीसाठी हमाल कंत्राट निश्चित करणेकामी जळगांव जिल्ह्यातील प्रत्यक्ष हमाली काम करणारे सदस्य यांच्या नोंदणीकृत हमाल कामगार सहकारीसंस्था व हमाल सदस्य असलेल्या सहकारी संस्थाकडुन 1. जळगांव 2. अमळनेर 3. भडगांव 4. भुसावळ 5. चाळीसगांव 6. चोपडा 7. मुक्ताईनगर 8. कुऱ्हा 9. एरंडोल 10. जामनेर 11. पाचोरा 12. पारोळा 13. रावेर, 14. सावदा 15. यावल 16. धरणगांव 17. बोदवड तालुका जिल्हा, जळगांव येथील गोदामातील उपगोदामातील अगर शासनाने भाड्याने घेतलेल्या गोदामांतील हमाल कामाकरीता इच्छुक हमाल कंत्राटदारांकडुन ई-निविदा दिनांक 17/12/2018 ते दि. 04/01/2019 रोजी दुपारी 5.00 वाजेपर्यत ई-निविदा (ऑनलाईन ) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

**खुल्या निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा सुचना प्रसिध्द करणे(जाहीरात) | दिनांक :- 17/12/2018 |
| 2 | इसारा रक्कम | निविदेच्या अटी व शर्ती मधील मुद्दा क्र 9.3.2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे तालुका इसा-याची रक्कम ऑनलाईन भरण्यात यावी. |
| 3 | निविदा प्रसिध्द करणे | दिनांक :- 17/12/2018 ते 04/01/2019. |
| 4 | निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक :- 17/12/2018 ते 04/01/2019. |
| 5 | प्री-बीड मिटींग | दि.19/12/2018 रोजी सकाळी 11.00वाजता |
| 6 | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक :- 04/ 01/ 2019 (दुपारी 5.00 वाजेपर्यंत ) |
| 7 | निविदा उघडणे | |
| | अ) तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक | दिनांक :- 07/ 01/2019 रोजी सकाळी 11.00वाजता |
| | ब)व्यापारी किंवा दराचा लिफाफा उघडण्याचा दिनांक | दिनांक :- 16/ 01/2019 रोजी सकाळी 11.00वाजता |
| 8 | जिल्हास्तरावर निविदा मंजुरीबाबत निर्णय | दिनांक :- 18/01/2019 |
| 9 | शासन स्तरावर निविदा मंजुरीबाबतचा प्रस्ताव सादर करणे | दिनांक :- 18/01/2019 |

निविदा पध्दतीकरिता उद्योग,उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र भाखंस-2014/प्र.क्र.82 भाग 3/उद्योग-6दि01डिसेंबर 2016 मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार द्वि-लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.व अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील .शासन निर्णय क्रमांक कंत्राट-1217/प्र.क्र.98/नापु16अ दि.08मे2018 मध्ये नमुद कार्यपध्दती सर्व विहीत अटी व शर्ती निविदाधारकांना बंधनकारक असतील

निविदा फार्म व निविदा संबधी सर्व अटी व शर्ती http://mahatenders.gov.in व www.jalgaon.nic.in या संकेत स्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

निविदा अर्ज शुल्क रु.5000/-( अक्षरी रुपये पाच हजार मात्र )इतके राहील. ते ना परतावा आहे. सदर शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे.

संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी जळगांव यांना राहील.

**टीप** :- शासकीय सुटीच्या दिवशी निविदासंबंधी कामकाज बंद राहील.

स्थळ प्रतीवर मा. जिल्हाधिकारी जळगांव यांची स्वाक्षरी असे.

जिल्हाधिकारी, जळगांव करिता
11/12/18

दिनांक- ११ / १२ / 2018.
ठिकाण - जळगांव